# विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर

(महाराष्ट्र शासन अंगीकृत उपक्रम)

## नियामक मंडळाची ६९ वी बैठक

दिनांक : ०८/०३/२०१८

## - कार्यवृत्त व मंजूर ठराव -

# विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर

## नियामक मंडळाच्या ६९ व्या बैठकीचे कार्यवृत्त

दिनांक ०८/०३/२०१८ रोजी विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाची ६९ वी बैठक मा.मंत्री, जलसंपदा व पदसिध्द अध्यक्ष, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली, मंत्रालयीन दालन क्र. ३०३, तिसरा मजला, मंत्रालय, मुंबई-३२ येथे संपन्न झाली. सदर बैठकीस खालील प्रमाणे मा. मंत्री, मा. राज्यमंत्री व सन्माननीय सदस्य तसेच शासनाचे संबंधित व निमंत्रित अधिकारी उपस्थित होते.

### (अ) नियामक मंडळाची उपस्थिती:-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. ना. श्री. गिरीष महाजन | : | मा. मंत्री, जलसंपदा व पदसिध्द अध्यक्ष |
| २. | मा. ना. श्री. विजय शिवतारे | : | मा.राज्यमंत्री, जलसंपदा व लाक्षेवि तथा उपाध्यक्ष, विपाविम, |
| ३. | मा. श्री. देवाशिष चक्रवती | : | अप्पर मुख्य सचिव (नियोजन) व सदस्य |
| ४. | श्री. आय. एस. चहल | : | प्रधान सचिव (ज.सं.प्र.व वि.) व व्यवस्थापकीय संचालक |
| ५. | मा. श्री. सी.ए.बिराजदार | : | सचिव (ज.सं.व्य. व लाक्षेवि) व सदस्य |
| ६. | मा. श्री. अ. वा. सुर्वे | : | कार्यकारी संचालक व सदस्य सचिव |
| | **निमंत्रित अधिकारी** | | |
| ७. | श्री. सं. कृ. घाणेकर | : | मु.अ., विशेष प्रकल्प, जसंवि, अमरावती |
| ८. | श्री. र. प्र. लांडेकर | : | मु.अ., जलसंपदा विभाग, अमरावती |
| ९. | श्री. अ.रा. कांबळे | : | मु.अ., गो.प्र., जलसंपदा विभाग, नागपूर |
| १०. | श्री. ब. शं. स्वामी | : | मु.अ., जलसंपदा विभाग, नागपूर |

सर्वप्रथम विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या ६९ व्या बैठकीस उपस्थित मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष व सन्माननीय सदस्यांचे कार्यकारी संचालक यांनी स्वागत केले. त्यानंतर मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने कार्यकारी संचालक यांनी विषयसूचीचे वाचन केले.

मान्य

(इं. अ. वा. सुर्वे)
**कार्यकारी संचालक व सदस्य सचिव**

**(गिरीष महाजन)**
**मा. मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष**

विषय क्रमांक १ :-

**दिनांक १९/०६/२०१७ रोजी संपन्न झालेल्या नियामक मंडळाच्या ६७ व्या बैठकीत पारित केलेल्या ठरावांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल नियामक मंडळास सादर करणेबाबत.**

नियामक मंडळाच्या दिनांक १९/०६/२०१७ रोजी संपन्न झालेल्या ६७ व्या बैठकीत पारित केलेल्या ठरावांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल नियामक मंडळाच्या अवलोकनार्थ परिशिष्ट-१ मधुन करण्यात येत असल्याचे कार्यकारी संचालक यांनी सांगितले.

विषय क्रमांक २:-

**नियामक मंडळाच्या ६८ व्या बैठकीतील ठराव वाचून कायम करणे.**

सदर विषय कार्यकारी संचालक यांनी नियामक मंडळासमोर खालील प्रमाणे विषद केला.

नियामक मंडळाची ६८ वी बैठक दिनांक ३१/०१/२०१८ रोजी मा. मंत्री, जलसंपदा तथा पदसिध्द अध्यक्ष, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली, मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली. सदर बैठकीचे कार्यवृत्त व मंजूर ठराव मा. मंत्री,जलसंपदा तथा अध्यक्ष यांचेकडे का. टि. दि.६/२/२०१८ अन्वये मंजुरीकरीता सादर केले होते. त्यास दि. ०७/०३/२०१८ रोजी मंजुरी प्राप्त झाली व महामंडळाचे पत्र क्र. २२६७ दि. ०७/०२/२०१८ नुसार सर्व संबंधितास पुढील कार्यवाहीसाठी पाठविणेत आलेले आहे.

ठराव क्र. ६८/०४ (निम्न पेढी), ठराव क्र. ६८/०७ {पुर्णा बॅरेज, कारंजा रमजानपूर (सं)) २ प्रकल्प}, ठराव क्र. ६८/०८ {राहेरा (सं.), आमपाटी लपायो, भिमडी लपायो, पवनी (सं), मैराळडोह लपायो, बेलमंडळ लपायो, कोयाळी (सं), बग्गी लपायो, किरमिरी दरुर उसिंयो – ९प्रकल्प} व ठराव क्र. ६८/३५ (शिरुड लपायो, काळीदौलतखान लपायो, चंद्रभागा मध्यम प्रकल्प, जयपूर लपायो, वाघाडी बॅरेज लपायो – ६ प्रकल्प,असे एकूण १८ प्रकल्पांचे मा. सचिव उपसमितीचे दि. ०९/११/२०१७ व दि. १३/१२/२०१७ बैठकीचे कार्यवृत्त अद्याप अप्राप्त आहे. या १८ प्रकल्पांचे सु.प्र.मा. प्रस्तावांना मा. सचिव उपसमितीने उपस्थित केलेल्या मुद्यांचे पुर्ततेच्या अटीसह मान्यता देण्यात आलेली आहे. त्यामुळे मा. सचिव उपसमितीकडून बैठकीचे कार्यवृत्त प्राप्त झाल्यानंतर व त्यामध्ये उपस्थित मुद्यांचे अनुपालन केल्यानंतरच या प्रकल्पांचे सु.प्र.मा. आदेशाबाबतची पुढील कार्यवाही करण्यात येईल.

उपरोक्त १८ प्रकल्प वगळता इतर सर्व प्रकल्पांचे बाबत मा. सचिव उपसमितीचे कार्यवृत्तानुसार मुद्यांचे अनुपालन ६८ व्या बैठकीत नियामक मंडळात सादर करण्यात आले होते.

मान्य

**(इं. अ. वा. सुर्वे)**
**कार्यकारी संचालक व सदस्य सचिव**

**(गिरीष महाजन)**
**मा. मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष**